**प्रेसनोट** दि.३०/०३/२०२२

एम.एस.ई.डी.सी.एल कंपनी मर्या., उप विभाग ऐरोली नवी मुंबई. येथील अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा प्रभाकर देशमुख वर्ग १, यांना लाच स्विकारल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने कारवाई केलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :— | रबाले पोलीस स्टेशन १६३/२०२२ भ्र.प्रति.अधि.१९८८ चे क.७ |
| लोकसेवीकेचे नांव व कार्यालय | :— | लोकसेविका श्रीमती वर्षा प्रभाकर देशमुख अतिरीक्त कार्यकारी अभियंता वर्ग १, एम.एस.ई.डी.सी.एल. कंपनी मर्या., उप विभाग ऐरोली, नवी मुंबई. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | ५०,०००/—रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | ५०,०००/—रू. |
| थोडक्यात हकीगत | :— | यातील तक्रारदार महिला हया काम करीत असलेल्या इलेक्ट्रिक कंत्राटदार कंपनीने इलेक्ट्रिकल कनेक्शनमध्ये अतिरिक्त लोड वाढविण्याचे कामाचे कंत्राट घेतले होते त्याकरीता अतिरीक्त कार्यकारी अभियंता एम.एस.ई.डी.सी.एल. उप विभाग ऐरोली नवी मुंबई. यांचेकडून शिफारस घेवून मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता, वाशी यांचेकडे पुढे पाठविणेकरीता तक्रारदार यांनी कंपनीचे वतीने लोकसेवक यांचे कार्यालयामध्ये कागदपत्रे सादर केलेली होती. सदर कामासाठी लोकसेविका श्रीमती देशमुख यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/—रु.लाचेची मागणी केली असले बाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात दि.२५.०३.२०२२ रोजी लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३०.०३.२०२२ रोजी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी केली असता लोकसेविका श्रीमती वर्षा देशमुख यांनी तक्रारदार यांचेकडे इलेक्ट्रिकल कनेक्शनमध्ये अतिरिक्त लोड वाढविण्याचे कामामध्ये शिफारस करुन मंजूरीसाठी पुढे पाठविणेकामी ५०,०००/—रूपये लाचेची मागणी करुन लागलीच लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत अेसीबी ठाणे युनिटने आज दिनांक ३०.०३.२०२२ रोजी एम.एस.ई.डी.सी.एल कंपनी मर्या.., उप विभाग कार्यालय ऐरोली नवी मुंबई. येथे सापळयाचे आयोजन केले असता लोकसेविका यांनी तक्रारदार महिले कडून ५०,०००/—रु.लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा. |

**मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.


१) संपर्कपत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेतस्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :—acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :— १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :—०२२—२०८१३५९९


पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

MAMore

(माया एच.मोरे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे